मिरा - भाईंदर महानगर पालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
आ. क्र.....................................
दाखल ता.......12/11/26.......



अॅड. एस.एस.शेलार

जाहिरनामा

आयुक्त
मि. भा. म.न.पा. आर. एस. भोसले सो,

नि. क्र. 19

मा. न्यायाधिश सो,
वारसांचे सर्टिफिकेट बद्दल

मिरा भाईंदर मनपा कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर डकवावे.

दिवाणी चौकशी अर्ज. नं. ७१५/२०२३

**नाशिक येथील मे. सि. ज. सो. सि. डि. नाशिक, यांचे कोर्टात**

ज्यापेक्षा हर्षा पियुष त्रिवेदी यांचे दि. १२.४.२०२३ रोजी गंगा ऋषीकेश हॉस्पिटल, नाशिक या पत्यावर मयत झालेले आहे. मयत हर्षा पियुष त्रिवेदी हे फ्लॅट नं. ३०२, विनायक पॅलेस, ६० फुटी रोड, जैन टेम्पलजवळ, भायंदर. (पश्चिम) ठाणे - ४०११०१ या पत्यावर रहात होते. हर्षा पियुष त्रिवेदी यांचे नावे -

अ. स्थावर मिळकती - तुकडी जि. ठाणे, पोट तुकडी तालुका भाईंदर (पश्चिम), येथील मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिळकत यांसी नगर भुमापन (सिटी सर्व्हे) क्रमांक १६१० यांसी भुमापन (सर्व्हे ) क्र. २८ यांसी हिस्सा क्र. १/ए यांसी क्षेत्र ३०६.२४ चौ. मी. येथील भुखंड क्र. १३ यावर बांधण्यात आलेल्या "श्री विनायक पॅलेस सहकारी गृहनिर्माण संस्था, भायंदर(पश्चिम)"चा नोंदणी क्र. टीएनए / (टीएनए)/ एचएसजी/ टीसी / १९१७३/२००७ दि. ११/१२/२००७ रोजी नोंदविलेल्या बांधीव इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. ३०२ यांसी सभासद क्र. ०१० (शेअर्स क्र. ०५६ ते ०६०) मिरा भाईंदर महानगरपालिका रेकॉर्डनुसार मालमत्ता क्र. ए०३०००० ३५४ २०२८ चे बांधीव क्षेत्र ३०० चौ. फुट म्हणजेच २७.८८ चौ. मी.

आ. जंगम मिळकती -

१. युनियन बँक, शाखा भायखळा, खाते क्र. ३१६२० २०१०० १५९४०.
२. युनियन बँक, शाखा भायखळा, खाते क्र. ३१६२० २०१०० १९०४४.
३. बसीन कॅथॉलिक को.ऑप.बँक, शाखा भाईंदर खाते क्र. १४५९५.
४. बसीन कॅथॉलिक को.ऑप.बँक, शाखा भाईंदर मुदत ठेव क्र. डीबीडी/ ११५६३/४.
५. बसीन कॅथॉलिक को. ऑप. बँक, शाखा भाईंदर मुदत ठेव क्र. डीबीडी / १५२६४/१.
६. प्रोग्रेसीव्ह शेअर ब्रोकर्स प्रा. लि., डी मॅट खाते क्र. १२०३३० ०००० १ ९५४८३ मधील शेअर्स.
७. प्रोग्रेसीव्ह शेअर ब्रोकर्स [illegible] डी मॅट खाते क्र. १२०३३० ०००० १ ९५४९८ मधील शेअर्स.

ज्यापेक्षा सदरहू अर्जदार [illegible] नलिन जोशी या सदरहू मयताचे वारसदार नव्हे असे कोणास आक्षेपाने असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याच्या आत स्वतः अगर आपले वकिलामार्फत नाशिक येथील मे. कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणीही योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे वारसदार असलेबाबत वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील ता. 29/1/2026 रोजी सकाळी १०.३० वाजता

कळावे हा जाहिरनामा.

सदरचा जाहिरनामा माझे सही शिक्यानिशी प्रसिध्द दिली.

तारीख 19/12 /२०२५

सही लिपिक.
बेलिफकार्ड

कोर्टाचा शिक्का

सही सह अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ
स्तर नाशिक.

दिवाणी न्यायाधीश, व. स्तर
नाशिक

चौ. अर्ज. नं. ७१५/२०२३

नाशिक येथील मे. सि. ज. सो. सि. डि. नाशिक, यांचे कोर्टात

मेघा नलिन जोशी
उ. व. ३०, धंदाः गृहिणी
रा. फ्लॅट नं. १२ए, आनंद टॉवर,
नवरंग हॉलजवळ, पेठ रोड, चित्रकुट,
पंचवटी, नाशिक - ४२२००३ अर्जदार

वि.

कोणीही नाही सामनेवाले

अर्ज : भारतीय वारसा कायद्यानुसार प्रोबेट दाखला मिळणेसाठीचा

अर्जदार मे. कोर्टास विनंतीपुर्वक कळवितात ते येणेप्रमाणे,

१. अर्जदार यांची चुलती हर्षा पियुष त्रिवेदी यांचे दि. १२.४.२०२३ रोजी गंगा ऋषीकेश हॉस्पिटल, नाशिक या पत्यावर निधन झालेले आहे.

२. हर्षा पियुष त्रिवेदी यांचे पती श्री. पियुष कांतीलाल त्रिवेदी हे दि. १६/३/२०२३ रोजी थुंगा हॉस्पिटल, मिरा रोड (पुर्व), जिल्हा ठाणे येथे मयत झालेले आहेत.

३. हर्षा पियुष त्रिवेदी यांना व श्री. पियुष कांतीलाल त्रिवेदी यांना कोणतेही अपत्य नव्हते व नाही. पियुष कांतीलाल त्रिवेदी यांचे मृत्युनंतर हर्षा पियुष त्रिवेदी यांना अर्धांगवायुचा झटका आल्याने व त्यांना मुल बाळ नसल्याने त्यांची सेवा सुश्रृषा करणारे भाईंदर, जि. ठाणे येथे कोणीही नसल्याने हर्षा पियुष त्रिवेदी या त्यांचे बंधुच्या पत्नी श्रीमती. निता नलिन जोशी यांचेकडे राहण्यास आल्या.

४. हर्षा पियुष त्रिवेदी या निता नलिन जोशी यांचेकडे राहण्यास आल्यानंतर त्यांची सर्व सुश्रृषा निता नलिन जोशी यांची मुलगी मेघा म्हणजेच अर्जदार यांनी करण्यास सुरुवात केली.

५. हर्षा पियुष त्रिवेदी यांनी त्यांच्या मृत्युपुर्वी दि. २८/३/२०२३ रोजी साक्षीदार श्री. नवीन कन्हैयालाल जोशी व लेनिन हिंमतलाल जोशी यांचे समक्ष अखेरचे मृत्युपत्र करून ठेवलेले होते.

६. हर्षा पियुष त्रिवेदी यांची सासु या पुर्वीच मयत झालेल्या आहेत. हर्षा पियुष त्रिवेदी यांचे भाऊ निरंजन रमेश जोशी व नलिन रमेश जोशी हे दोघे देखील मयत झालेले आहेत.

७. हर्षा पियुष त्रिवेदी यांच्या अखेरच्या मृत्युपत्रानुसार मयत हर्षा पियुष त्रिवेदी यांनी त्यांचे व त्यांचे पतीचे नावावरील स्थावर व जंगम मिळकतींची व्यवस्था केलेली आहे. त्या मिळकतींचा तपशिल पुढीलप्रमाणे –

अ. स्थावर मिळकती – तुकडी जि. ठाणे, पोट तुकडी तालुका भाईंदर (पश्चिम), येथील मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिळकत यांसी नगर भुमापन (सिटी सर्व्हे) क्रमांक १६१० यांसी भुमापन (सर्व्हे ) क्र. २८ यांसी हिस्सा क्र. १/ए यांसी क्षेत्र ३७६.२४ चौ. मी. येथील भुखंड क्र. १३ यावर बांधण्यात आलेल्या "श्री विनायक पॅलेस सहकारी गृहनिर्माण संस्था, भायंदर(पश्चिम)"चा नोंदणी क्र. टीएनए / (टीएनए)/ एचएसजी/ टीसी / १९१७३/२००७ दि. ११/१२/२००७ रोजी नोंदविलेल्या बांधीव इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील सदनिका क्र. ३०२ यांसी सभासद क्र. ०१० (शेअर्स क्र. ०५६ ते ०६०) मिरा भाईंदर महानगरपालिका रेकॉर्डनुसार मालमत्ता क्र. ए०३००० ३५४ २०२८ चे बांधीव क्षेत्र ३०० चौ. फुट म्हणजेच २७.८८ चौ. मी.

आ. जंगम मिळकती –

१. युनियन बँक, शाखा भायखळा, खाते क्र. ३१६२० २०१०० १५९४०.
२. युनियन बँक, शाखा भायखळा, खाते क्र. ३१६२० २०१०० १९०४४.
३. बसीन कॅथॉलिक को.ऑप.बँक, शाखा भाईंदर खाते क्र. १४५९५.
४. बसीन कॅथॉलिक को.ऑप.बँक, शाखा भाईंदर मुदत ठेव क्र. डीबीडी/ ११५६३/४.
५. बसीन कॅथॉलिक को. ऑप. बँक, शाखा भाईंदर मुदत ठेव क्र. डीबीडी / १५२६४/१.
६. प्रोग्रेसीव्ह शेअर ब्रोकर्स प्रा. लि., डी मॅट खाते क्र.१२०३३९ ००००१ ९५४८३ मधील शेअर्स.
७. प्रोग्रेसीव्ह शेअर ब्रोकर्स प्रा. लि., डी मॅट खाते क्र.१२०३३९ ००००१ ९५४९८ मधील शेअर्स.

८. कलम ७अ मध्ये नमुद केलेली स्थावर मिळकत पियुष कांतीलाल त्रिवेदी यांचे स्वकष्टार्जित मालकीची मिळकत होती त्यांचे मृत्युनंतर सदरची मिळकत मयत हर्षा पियुष त्रिवेदी यांची स्वतंत्र मालकीची मिळकत झालेली आहे.

९. कलम ७आ मध्ये वर्णन केलेल्या जंगम मिळकती पैकी ७आ.१, ७आ.४, ७आ.५, ७आ.६, ७आ.८ या मिळकती पियुष कांतीलाल त्रिवेदी व हर्षा पियुष त्रिवेदी यांचे एकत्रित नावावरील मिळकती आहेत.

कलम ७आ.७ मध्ये वर्णन केलेली मिळकत पियुष कांतीलाल त्रिवेदी यांचे एकटयाचे नावावरील आहे. त्यांना हर्षा पियुष त्रिवेदी यांचेशिवाय दुसरे कोणीही वारस नव्हते.

कलम ७आ.२, ७आ.९ मध्ये वर्णन केलेल्या मिळकती या हर्षा पियुष त्रिवेदी यांचे नावावरील मिळकती आहेत.

कलम ७आ.३, ७आ.१० या मिळकती हर्षा पियुष त्रिवेदी यांचे पती पियुष कांतीलाल त्रिवेदी व प्रकाश श्रीधर कारुलकर यांचे एकत्रित नावावरील मिळकती आहेत. त्यातील पियुष कांतीलाल त्रिवेदी यांचे हिश्याचे शेअर्स. या मिळकती इच्छापत्रान्वये हर्षा पियुष त्रिवेदी यांनी अर्जदार यांना दिलेल्या आहेत.

१०. अर्जदार यांनी कलम ७ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतींच्या अनुषंगाने संबंधित विभागाकडे चौकशी केली असता त्यांनी प्रोबेट सर्टिफिकेट आणावे असे सांगितले. त्यामुळे इच्छापत्रानुसार प्रोबेटचा दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल करावा लागलेला आहे.

११. प्रस्तुत प्रकरणासोबत मयत हर्षा पियुष त्रिवेदी यांनी दि. २८/३/२०२३ रोजी करुन ठेवलेले अखेरचे मृत्युपत्र जोडलेले आहे. त्या मृत्युपत्राबाबत कोणाचीही हरकत नाही, तक्रार नाही.

१२. दि. २८/३/२०२३ रोजी हर्षा पियुष त्रिवेदी यांनी सानिध्य ओल्ड एज होम, राजीवनगर, नाशिक येथे राहत असतांना अखेरचे मृत्युपत्र लिहुन ठेवले तेथेच त्यांचा मृत्यु झालेला आहे.

१३. अर्जदार यांना प्रोबेट दाखला देण्यास कोणतीही हरकत नाही.

१४. अर्जदार यांचे नावाने प्रोबेट दाखला देण्यास भारतीय वारसा कायद्याच्या तरतुदीनुसार कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध / अडथळा नाही.

१५. अर्जदार यांनी सदरचा अर्ज हर्षा पियुष त्रिवेदी यांचे व त्यांचे पतीचे नांवावरील अर्ज कलम ७ मध्ये नमुद केलेल्या स्थावर व जंगम मिळकतींच्या अनुषंगाने प्रोबेट दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

१६. प्रस्तुत प्रकरणाशिवाय इच्छापत्राच्या अनुषंगाने इतर कोणतेही प्रकरण भारतातील इतर कुठल्याही न्यायालयात अर्जदार यांचे माहितीनुसार कुणीही दाखल केलेले नव्हते वा प्रलंबित नाही.

१७. <u>अर्जास कारण</u> : दि. १२/४/२०२३ रोजी हर्षा पियुष त्रिवेदी यांचा मृत्यु झाल्यानंतर दि. २८/३/२०२३ रोजीच्या मृत्युपत्रानुसार कलम ७ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या रेकॉर्डला अर्जदाराचे नाव लावावे अशी विनंती केली असता

संबंधित विभागाने दिवाणी न्यायालयाकडुन प्रोबेट दाखला आणावा असे सांगितले. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज दाखल करावा लागलेला आहे.

१८. अधिकार क्षेत्र : हर्षा पियुष त्रिवेदी यांचा मृत्यु गंगा ऋषीकेश हॉस्टिपल, नाशिक येथे झाला. तसेच त्यांनी त्यांचे अखेरचे मृत्युपत्र सानिध्य ओल्ड एज होम, राजीवनगर, नाशिक येथे तयार करुन ठेवले. त्यामुळे मे. कोर्टाचे नियमित अधिकारात प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

१९. मुदत : अर्जास मुदतीची बाधा नाही.

२०. कोर्ट फी : अर्ज भारतीय वारसा कायद्याच्या तरतुदीनुसार प्रोबेट दाखला मिळणेसाठी असल्याने त्याची ठराविक कोर्ट फी रक्कम रू. ५०/- अर्जासोबत जोडुन दिलेली आहे.

२१. प्रोबेटसाठी आवश्यक असलेली कोर्ट फीची रक्कम भरण्यास अर्जदार तयार आहेत.

२२. सबब विनंती की,

१. अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

२. हर्षा पियुष त्रिवेदी व पियुष कांतीलाल त्रिवेदी यांचे नावावरील कलम ७ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या रेकॉर्डला अर्जदार मेघा नलिन जोशी यांचे नाव लागण्यासाठी व जंगम मिळकती अर्जदार यांना मिळणेसाठी भारतीय वारसा कायद्याच्या तरतुदीनुसार प्रोबेट दाखला देण्याचा हुकुम व्हावा.

३. इतर योग्य व न्यायाचे हुकुम अर्जदार यांचे लाभात करण्यात यावेत.

नाशिक
दिनांक : २१/९/२०२३

अर्जदार
मेघा नलिन जोशी,

प्रतिज्ञालेख

याकामी मेघा नलिन जोशी, उ. व. ३०, धंदाः गृहिणी, रा. फ्लॅट नं. १२ए, आनंद टॉवर, नवरंग हॉलजवळ, पेठ रोड, चित्रकुट, पंचवटी, नाशिक-४२२००३ सत्य प्रतिज्ञेवर कथन करते की, अर्जात लिहीलेला संपुर्ण मजकुर माझे ज्ञान, माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असुन त्याचे सत्यतेसाठी मी माझी सही प्रस्तुत लेखाखाली केली आहे.

नाशिक
दिनांक : २१/९/२०२३

अर्जदार
मेघा नलिन जोशी,

भारतीय वारसा कायद्याचे कलम २८१ प्रमाणे

व्हेरिफिकेशन

मी नविन कन्हैयालाल जोशी उ. व. ६३, धंदाः व्यापार, रा. १, विहार सोसायटी, आपला महाराष्ट्र कॉलनी, हिरावाडी रोड, पंचवटी, नाशिक सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

मी हर्षा पियुष त्रिवेदी यांनी दि. २८/३/२०२३ रोजी लिहुन ठेवलेल्या अखेरचे मृत्युपत्रावरील साक्षीदार क्र. १ आहे. अखेरचे मृत्युपत्र लिहुन ठेवलेले मी पाहिलेले आहे मी त्या मृत्युपत्रावरील साक्षीदार क्रमांक १ आहे. अखेरचे मृत्युपत्र करुन ठेवणार यांनी माझे समक्ष सही केलेली आहे. सही करण्यापुर्वी अखेरचे मृत्युपत्र लिहुन ठेवणार यांनी अखेरचे मृत्युपत्रातील मजकुर बरोबर असल्याची खात्री माझे समक्ष केलेली होती. दि. २८/३/२०२३ रोजीच्या मृत्युपत्रातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर आहे. वरील संपुर्ण मजकुर माझे ज्ञान, माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्याचे सत्यतेसाठी मी माझी सही प्रस्तुत लेखाखाली केली आहे.

अखेरचे मृत्युपत्रावरील साक्षीदार
नविन कन्हैयालाल जोशी

भारतीय वारसा कायद्याचे कलम २८१ प्रमाणे

व्हेरिफिकेशन

मी लेनिन हिंमतलाल जोशी उ. व. ५८, धंदाः व्यापार, रा. ५, श्री कलाविश्व को. ऑप. हौ. सोसायटी, मुंबई आग्रा रोड, भाभानगर, नाशिक सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

मी हर्षा पियुष त्रिवेदी यांनी दि. २८/३/२०२३ रोजी लिहुन ठेवलेल्या अखेरचे मृत्युपत्रावरील साक्षीदार क्र. २ आहे. अखेरचे मृत्युपत्र लिहुन ठेवलेले मी पाहिलेले आहे मी त्या मृत्युपत्रावरील साक्षीदार क्रमांक २ आहे. अखेरचे मृत्युपत्र करुन ठेवणार यांनी माझे समक्ष सही केलेली आहे. सही करण्यापुर्वी अखेरचे मृत्युपत्र लिहुन ठेवणार यांनी अखेरचे मृत्युपत्रातील मजकुर बरोबर असल्याची खात्री माझे समक्ष केलेली होती. दि. २८/३/२०२३ रोजीच्या मृत्युपत्रातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर आहे. वरील संपुर्ण मजकुर माझे ज्ञान, माहिती व

समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्याचे सत्यतेसाठी मी माझी सही प्रस्तुत लेखाखाली केली आहे.

अखेरचे मृत्युपत्रावरील साक्षीदार
लेनिन हिंमतलाल जोशी

ॲडव्होकेट